ePaper
|| वर्ष - 8 । अंक -112 || UDYAM-MH-26-0158827 ||

# खरा उमेदवार कोण? जनता सर्व जाणते, आता माघार नाही: रवि लांडगे



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- रोहित फार काळ टिकू शकला नाही
- वाईड बॉलवर फलंदाज कसा बाद होतो?
- सम-समान फॉर्म्युल्यावर प्रश्नचिन्ह!
- तांडेलाचे डोके ; कापून बोट दिली पेटवून!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 30 ऑक्टोंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



### आमदार महेश लांडगे यांचे प्रचंड शक्तीप्रदर्शन

# भोसरीत भगवे वादळ!

## मिशन विधानसभा : पदयात्रेमध्ये 40 हजार समर्थकांचा सहभाग

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी**

**भोसरी विधानसभा मतदार संघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांनी प्रचंड शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी समर्थकांनी विजयाची 'हॅटट्रीक' करण्याचा निर्धार केला.**

सकाळी ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज आणि प्रमुख मंदिरांमध्ये दर्शन घेण्यात आले. त्यानंतर पदयात्रेला सुरवात करण्यात आली. बापुजी बुआ चौक- लांडगे लिंबाजी तालिम मित्र मंडळ- भैरवनाथ मंदिर- मारुती मंदिर- पीएमटी चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पाहार घालून अभिवादन- संत तुकाराम मंगल कार्यालय येथे पदयात्रेचा समारोप करण्यात आला.



भाजपा-शिवसेना- राष्ट्रवादी- आरपीआय- मित्र पक्ष महायुतीच्या माध्यमातून भोसरी विधानसभा मतदार संघातून अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला.

यावेळी माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव, माजी महापौर मंगला कदम यांच्यासह राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, शिवसेना नेते इरफान सय्यद, आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाला वाव्हळकर, बाळासाहेब भागवत उपस्थित होते.

पूर्णानगर येथील निवडणूक कचेरीमध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. आमदार महेश लांडगे यांच्या शक्तीप्रदर्शनामुळे भोसरीच्या निवडणुकीत मोठी रंगत आली आहे.

"१० वर्षे विकासाची.. निरंतर विश्वासाची.." या ध्येयाने ही निवडून विकासाच्या मुद्यांवर आम्ही लढवत आहोत. पिंपरी-चिंचवडकरांच्या हितासाठी अविरतपणे काम करीत राहीन, असा शब्द देतो. ग्रामदैवतांसमोर नतमस्तक होवून आणि वडीलधाऱ्यांचे आशिर्वाद घेवून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सकाळी निवासस्थानापासून पदयात्रेला सुरूवात झाली. भोसरी पंचक्रोशीतील सर्व सहकारी, मित्र परिवार आणि हितचिंतकांनी तसेच, महायुतीच्या सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. वडीलधाऱ्यांचे आशिर्वाद आणि साथ यामुळे विजयी शंखनाद झाला आहे.

**- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### ढोल-ताशांचा गजर अन् 'जय श्रीराम'चा नारा..!

ढोल-ताशा पथकांचा दणदणाट करीत ४० हजार समर्थकांचा जनसमुदायाची पदयात्रा दिमाखात निघाली. ठिकठिकाणी रांगोळी काढण्यात आली होती. तसेच, प्रमुख चौकांत भव्य पुष्पवृष्टी करण्यात आली. ढोल-ताशांवर पीएमटी चौकात आमदार महेश लांडगे यांनी ठेका धरला. समर्थक-हितचिंतकांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. विशेष म्हणजे, महायुतीच्या घटकपक्षांसह सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी पदयात्रेत सहभाग घेतला. अत्यंत नियोजनबद्ध काढलेल्या पदयात्रेची संत तुकाराम महाराज मंगल कार्यालय येथे सांगता करण्यात आली.

# दिवाळीची मिठाई खाता आहात... जरा जपून!

## आरोग्य तज्ञांचा सल्ला: वाढला मधुमेहासह हृदयविकाराचा धोका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवाळीच्या काळात मिठाईची रेलचेल असल्याने ती खाण्याचे प्रमाण वाढते. मिठाई खाण्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढण्यासोबत रक्तदाबामध्ये वाढ होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे मधुमेह आणि हृदयविकार असलेल्या रुग्णांमध्ये तीव्र धोका निर्माण होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर दिवाळीच्या काळात मिठाई खाताना काळजी घेण्याचा सल्ला आरोग्यतज्ज्ञांनी दिला आहे..**




दिवाळीच्या काळात रक्तातील साखरेची पातळी वाढण्याची काही कारणे आहेत. या काळात दिवाळी फराळासह मिठाईचे सेवन मोठ्या प्रमाणात केले जाते. सणासुदीचा काळ असल्याने तोंड गोड करण्याच्या नावाखाली मिठाई खाताना हात आखडता घेतला जात नाही. मिठाई आणि तळलेले पदार्थ रक्तातील साखर वाढविण्यास कारणीभूत ठरतात. याचबरोबर दिवाळीच्या काळात सुटी असल्याने शारीरिक हालचाल मंदावलेली असते. मिठाईचे अतिसेवन आणि कमी हालचाल यामुळे रक्तदाबात वाढ होते.

दिवाळीच्या काळात मधुमेह आणि हृदयविकार असलेल्या रुग्णांना असलेला धोका आणखी वाढतो. त्यामुळे त्यांनी विशेष काळजी घ्यायला हवी. याबाबत आरोग्यतज्ज्ञ डॉ. पूनम शहा म्हणाल्या, की मधुमेहपूर्व आणि मधुमेह असलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या व्यक्तींना प्रतिबंधात्मक काळजी घेणे गरजेचे आहे. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित कशी ठेवता येईल, याचा त्यांनी प्रयत्न करावा. मिठाई खाताना ती कमी प्रमाणात खावी. मिठाईसोबत प्रथिनयुक्त पदार्थ खावेत. यामुळे आहार संतुलित होऊन साखरेची पातळी फार वाढत नाही.

दिवाळीच्या काळात सुटी असल्याने शारीरिक हालचाली कमी होतात. त्यामुळे व्यायाम करण्यावर भर द्यायला हवा. रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढत नाही. त्यामुळे ती वाढू नये यासाठी प्रयत्न करावेत. मिठाईसह तळलेले पदार्थ खाल्ल्यानंतर व्यायाम टाळू नये. याचबरोबर आता शुगर फ्री मिठाईचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत. केवळ शुगर फ्री आहेत, म्हणून ते जास्त प्रमाणात खाऊ नयेत. त्याचेही दुष्परिणाम आरोग्यावर होऊ शकतात, असे डॉ. शहा यांनी नमूद केले.

### काळजी काय घ्यावी?

1. रक्तातील साखरेची पातळी वेळोवेळी तपासा.
2. रक्तदाब नियमितपणे तपासा.
3. मिठाईचे सेवन कमी प्रमाणात करा.
4. जास्त उष्मांक असलेले तळलेले पदार्थ टाळा.
5. शारीरिक हालचाल, व्यायामावर भर द्या.
6. शुगर फ्री मिठाईचेही अतिसेवन टाळा.
7. दिवसभरात भरपूर पाणी प्या.
8. चहा, कॉफी, मद्यपान टाळावे.
9. पालेभाज्यांचा आहारात जास्तीत जास्त समावेश करा.

# नाराज श्रीनाथ भिमाले पक्षकार्यात सक्रीय

## पर्वती मतदार संघातील तिढा सुटला: महायुतीसाठी लढणार व जिंकणार!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**पुण्यात पर्वती विधानसभेच्या उमेदवारीबाबत रस्सीखेच दिसून आली होती. पर्वती विधानसभा मतदार संघातून आमदार माधुरी मिसाळ इच्छुक असताना माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले यांनी मिसाळ यांच्या विरोधात दंड थोपटले होते. मी 'लढणार आणि जिंकणारच' असा नारा त्यांनी दिला होता. परंतु या मतदारसंघातून मिसाळ यांना उमेदवारी देण्यात आली. त्यानंतर नाराज श्रीनाथ भिमाले यांनी २ दिवसात भूमिका स्पष्ट करणार असल्याचे सांगितले होते. भिमाले बंडखोरी करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. अखेर त्यांचे बंड थंड झाले असून महायुतीचे सरकार आणण्यासाठी लढणार आणि जिंकणार असा नारा देत पक्षाच्या कमाला सुरुवात केली आहे.**

भिमाले म्हणाले, मागच्या ४ दिवसापूर्वी मला देवेंद्र फडणवीस यांचा फोन आला होता. नंतर त्यांची माझी भेटही झाली. त्यांनी सांगितलं की, आपल्याला महायुतीचे काम करायचंय सरकार आणायचं आहे. पुढील काळात आपण भाऊ म्हणून काम करू. तुम्ही महायुतीच्या जागा आणण्यासाठी प्रयत्न करा. आपल्याला ८ उमेदवार निवडून आणायचे आहेत. मी २७ वर्षे काम करतोय. सर्व नेते देवेंद्रजी, मुरलीधर मोहोळ सोबत आहेत. राज्यात देवेंद्रजींचे हात मजबूत करण्यासाठी महायुती आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. माझ्यासारख्या छोट्या कार्यकर्त्याला त्यांनी सांगितलं. लहान भाऊ म्हणून मला शब्द दिला. की मी तुझ्यासोबत आहे. त्यामुळे मी पुढं जाऊन अशी भूमिका करायला नको असं कार्यकर्त्यांना सांगितलं. आता ८ आमदार निवडून आणायचे काम करणार आहोत. आम्ही कुठलंही बंड करणार नव्हतो. भारतीय जनता पार्टी मध्ये मला न्याय मिळेल याची खात्री देवेंद्र आणि मुरली भाऊंनी दिली. मी कुठलाही अपक्ष फॉर्म भरणार नाही. मी फक्त भाजपच काम करत राहणार आहे. आता महायुतीचे सरकार आणण्यासाठी लढणार आणि जिंकणार. महायुती आणि भाजपसाठी काम करत राहणार.

### खडकवासला, वडगावशेरीत मैत्री...

खडकवासला आणि वडगाव शेरी मतदार संघात होणाऱ्या मैत्रीपूर्ण लढती न होण्याच्या भूमिकेला पूर्णविराम मिळाला आहे. वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातुन भाजपचे माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक भाजपचा एबी फार्म घेऊन फॉर्म भरण्यासाठी गेले होते. मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उमेदवारी अर्ज न भरण्याचा आदेश दिला. त्यामुळे मुळीक यांनी उमेदवारी अर्ज भरला नाही. खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाकडून माजी महापौर दत्ता धनकवडे यांना अधिकृतपणे ए बी फॉर्म देण्यात आला होता. त्यांनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्ज भरू नका असा आदेश दिला. त्यानुसार धनकवडे यांनी अर्ज भरला नाही. आपल्या उमेदवाराच्या विरोधात उमेदवार देउन मैत्रीपुर्ण लढत होउ नये याबाबत दबाव टाकण्यासाठी भाजप, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटाने ही खेळी खेळली असल्याचे समजते आहे.

# पिंपरीत एकच नारा ‘आण्णा हवा पुन्हा’!

## विधानसभा निवडणूक : विद्यमान आमदार आण्णा बनसोडे यांची प्रचारात आघाडी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी विधानसभा मतदार संघातील विद्यमान आमदार आण्णा बनसोडे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून, ‘आण्णा हवा पुन्हा’ हे घोषवाक्य चांगलेच चर्चेत आले आहे. या मतदार संघात विक्रमी विजयासाठी शहराध्यक्ष योगेश बहल यांनी प्रचाराची सूत्रे हातात घेतली आहेत.**




पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस-भाजप-शिवसेना-आरपीआय (आठवले) मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करीत विधानसभेच्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात निवडणूक अधिकारी अर्चना यादव यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज सादर केला आहे. त्यानंतर प्रचाराला जोमाने सुरूवात केली आहे.

यावेळी त्यांच्यासोबत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष योगेश बहल, खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना शिंदे गटाचे उपनेते इरफान सय्यद, भाजपकडून आमदार अमित गोरखे, उमा खापरे उपस्थित होते.

दरम्यान मतदार संघातून निघताना मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि मतदार संघातील नागरिक स्वयंस्फूर्तीने आमदार बनसोडे यांच्यासोबत होते. विशेषतः महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी रस्त्यांच्या दुतर्फा उभे राहून तसेच घरांच्या छतावरून नागरिक हे अण्णा बनसोडे यांच्यावर पुष्पवृष्टी करीत होते. नागरिकांचा हा उत्स्फूर्त उत्साह आणि कार्यकर्त्यांची गर्दी पाहून आमदार बनसोडे यांचे हृदय भरून आले. अर्ज भरल्यानंतर बनसोडे यांनी सहभागी महायुतीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि पिंपरी विधानसभेतील नागरिकांचे मनापासून आभार व्यक्त केले. तसेच मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी येत्या २० तारखेला भरभरून मतदान करा, असं आवाहन बनसोडे यांनी यावेळी केलं आहे.

### माझा विजय निश्चित: बनसोडे

माध्यमांशी संवाद साधताना आमदार बनसोडे म्हणाले, ‘महायुतीच्या सर्वच घटक पक्षाकडून मला पाठींबा मिळाला आहे. पिंपरी विधानसभेतील जनता माझ्या कामावर समाधानी आहे. माझ्यासह महायुतीचे सर्वच उमेदवार निवडून येतील याची मला खात्री आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या स्थापनेपासून मी पक्षाचे काम करीत आहे. नव्या उमेदीने पक्षाचे काम चालू ठेवले. या कार्याची दखल घेऊन पक्षाने माझ्यावर पुन्हा विश्वास व्यक्त केला. जुन्या वादांवर आता पडदा पडला आहे. पक्षातील सर्व मित्र, पदाधिकारी आणि कार्यकर्ते माझ्याबरोबर कायम आहेत. त्यामुळे माझा विजय निश्चित आहे.

---

# दिवंगत जगताप यांच्यामुळे शहराचा कायापालट

## आमदार अश्विनी जगताप : महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांना साथ द्या

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभेच्या शाश्वत विकासासाठी महायुतीचे सरकार कटिबद्ध आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या दूरदृष्टी नेतृत्वामुळेच आज या मतदारसंघाचा कायापालट झाला आहे. चिंचवड मतदार संघात विकासाची घोडदौड कायम ठेवण्यासाठी महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांना आपण सर्वांनी प्रचंड मतांनी विजयी करत विधानसभेवर पाठवण्यात असे आवाहन आमदार अश्विनी जगताप यांनी केले आहे.**



चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टी शिवसेना राष्ट्रवादी कॉंग्रेस आरपीआय (ए) व मित्र पक्षाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ आमदार अश्विनी जगताप यांनी आज वाकड विनोदे वस्ती परिसरातील सोसायटी धारकांच्या गाठीभेटी घेतल्या.

यावेळी त्यांच्यासोबत याप्रसंगी पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्या प्रा. भारती विनोदे, विशाल कलाटे, संत तुकाराम सह.सा. का.संचालक बाळासाहेब विनोदे, प्रसाद कस्पटे, विजय विनोदे, अक्षय विनोदे, मुकेश विनोदे, निखिल इंगवले, शैलेश लोखंडे, सूरज भुजबळ, प्रमोद भुजबळ, सनी भुजबळ, अक्षय कलाटे, विक्रम कलाटे यांच्यासह सोसायटी धारक सदस्य , नागरिक , बंधु-भगिनी यांच्यासह भारतीय जनता पक्ष तसेच महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. वाकड विनोदी वस्ती परिसरातील रॉयल कॅस्टल, अॅटलांटा, साई लक्झरीया, ट्रिनिटी, इट्रेंड, ऍक्रोपॉलिस, कोहिनूर कोर्टयार्ड, पंव्हेलीयन 79, यासह प्रमुख सोसायटींना भेटी देत तेथील मतदारांशी संवाद साधला. नागरिकांनीही यावेळी आमदार अश्विनी जगताप यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. आम्ही शाश्वत विकासाच्या म्हणजेच भारतीय जनता पक्षाच्या पाठीशी आहोत असे सांगत होते.

### सोसायटीधारक मतदार भाजपच्याच पाठीशी..

आमदार अश्विनी जगताप म्हणाल्या की, वाकड- विनोदे वस्ती हा परिसर आयटी हब हिंजवडीचे प्रवेशद्वार आहे. या परिसरात वाढते नागरिकरण यामुळे वाहतूकीची समस्या निर्माण होत होती. परंतु आता मेट्रो या परिसरात धावणार आहे. त्याचे काम देखील वेगाने सुरू आहे. तसेच सिग्नल फ्री, सुसज्ज असे रस्ते करण्याचाही भाजपचा मानस आहे. भारतीय जनता पक्षाने शंकर जगताप यांना या मतदारसंघात नेतृत्व करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे नक्कीच या भागातील सोसायटी धारक मतदार शंकर जगताप यांच्या म्हणजेच भाजपच्या पाठीशी राहतील असा ठाम विश्वास आहे, प्रतिक्रिया आमदार अश्विनी जगताप यांनी दिली आहे.

### थेरगावमध्ये शंकर जगताप यांच्या प्रचाराचा श्रीगणेशा

दरम्यान, शंकर जगताप यांच्या प्रचाराचा आज थेरगाव येथे शुभारंभ झाला. गणेश नगर येथील श्री गणरायाच्या चरणी नारळ वाढवून भव्य पदयात्रा काढण्यात आली.

थेरगावमधील नागरिकांनीही मोठ्या उत्साहात जगताप यांचे ढोल ताशांच्या गजरात आणि फटाक्यांची आतिषबाजी करत स्वागत केले. यावेळी महिलांनी जागोजागी जगताप यांचे औक्षण केले. व आम्ही तुमच्यासोबत आहोत हा विश्वास दिला. पदयात्रेदरम्यान जगताप यांनी थेरगावमधील तक्षशिला बौद्ध विहारासह विविध धार्मिक स्थळांना आणि समाज मंदिरांना भेट दिली. यावेळी समाजबांधवांच्या वतीने जगताप यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.



## भूमिका

# जिंकून येतो असे म्हणूच नका

**सकाळचे सहा वाजलेले. आडवळणावर असलेल्या आंतरवली सराटीचे शिवार राज्यभरातून आलेल्या इच्छुकांच्या गर्दीने फुलून गेलेले. तेवढ्यात ध्वनिक्षेपकावरून घोषणा झाली. 'सर्वांना सूचित करण्यात येते की, आपल्या सर्वांचे भाग्यविधाते जरांगे पाटील बरोब्बर दहाच्या ठोक्याला मुलाखतीला सुरुवात करतील. उपोषण असो वा आंदोलन.**

प्रत्येक कृती न थकता सलग करायची व विश्वविक्रमाकडे वाटचाल करायची हेच आम्हा सर्वांचे धोरण राहिले आहे. त्यामुळे २४ तासांत ८०० इच्छुकांच्या मुलाखती पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार प्रत्येकाला एक मिनिट आठ सेकंदांचा वेळ त्याचे म्हणणे मांडण्यासाठी मिळेल. म्हणून वायफळ न बोलता मुद्द्याचे बोलून पुढे सरकावे ही विनंती.' हे ऐकताच किमान अर्धा तास तरी बाजू मांडण्यासाठी मिळेल या आशेने आलेल्या अनेकांचा हिरमोड झाला. मग प्रत्येकजण एका मिनिटात काय बोलायचे याची जुळवाजुळव मनात करू लागला.काहींनी श्वास न घेता फाडफाड बोलले तर १०० ते १२५ शब्द बोलता येतील हे गृहीत धरून तिथेच तालीम सुरू केली. फारच कमी वेळ दिला म्हणून काहींनी आयोजकांशी वादही घातला. राष्ट्रीय पक्षसुद्धा यापेक्षा जास्त वेळ मुलाखतीला देतात असा त्यांचा



युक्तिवाद होता. यावर आयोजकांनी 'पाटलांचा आदेश शिरसावंद्य' असे नेहमीचे उत्तर दिले. यापेक्षा देवदर्शनालासुद्धा अधिक वेळ मिळतो अशी कुजबुज काहींनी केली पण उघडपणे बोलण्याचे धाडस कुणी दाखवले नाही. ठरल्याप्रमाणे मुलाखतींना सुरुवात झाली. पहिला इच्छुक आत गेला व अर्ध्याच मिनिटात बाहेर आला तसे सारे त्याच्याभोवती गोळा झाले. त्यावर तो म्हणाला 'उमेदवारी मिळाली तर मी सहज निवडून येतो एवढेच बोललो तर त्यांनी मला बाहेर जायला सांगितले' हे ऐकून सारेच चिंतेत पडले. असे का घडले असेल यावर डोके खाजवू लागले. तेवढ्यात आयोजकांपैकी एक त्यातल्या काहींच्या कानात कुजबुजला. 'जिंकून येतो असे म्हणूच नका. महायुतीच्या उमेदवाराला पाडतो म्हणा' हे ऐकताच उपस्थितांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. मग पाडायचे कसे याच्या उत्तराची जुळवाजुळव करत एकेक आत जायला लागले. काही काळ शांततेत गेल्यावर एक दहा सेकंदांच्या आतच बाहेर आला तोही रडत. 'आरक्षण मिळावे म्हणून मी आजवर ९० वेळा उपोषण केले असे सांगताच मला खुणेनेच जा असे सांगण्यात आले.' हे ऐकून जमलेले सर्व त्याच्यावर चिडले. 'अरे, उपोषणांचा विक्रम पाटलांच्या नावावर. तो तू मोडला असे सांगायची गरज काय?' काही काळानंतर आणखी एक अतिशय आनंदात बाहेर आला. 'तुमच्या प्रत्येक रॅलीत फुले उधळण्यासाठी मी दहा जेसीबी भाड्याने लावले होते असे सांगताच फॉर्म भरा असा आदेशच त्यांनी दिला.' हे ऐकून ऐपत असूनही याकडे दुर्लक्ष केले म्हणून काही जण हळहळले. नंतर एक इच्छुक डोळे पुसतच बाहेर आला. 'समाजातील सर्वांनी मते दिली तर विरोधातील शिंदेसेनेचा उमेदवार पडू शकतो असे म्हणताच त्यांनी 'पुढचा' म्हणत मला बाहेर काढले. यावरून पाटलांचा इशारा नेमका काय याची जाणीव इतरांना झाली. तेवढ्यात ध्वनिक्षेपकावरून पुन्हा घोषणा झाली. 'काही राजकीय नेते पाटलांच्या भेटीसाठी आल्याने एक तासासाठी मुलाखती थांबवण्यात येत आहेत. ही वेळ भरून काढण्यासाठी नव्या सत्रात इच्छुकांच्या वेळेत २८ सेकंदांची कपात करण्यात आली आहे.'काहींनी श्वास न घेता फाडफाड बोलले तर १०० ते १२५ शब्द बोलता येतील हे गृहीत धरून तिथेच तालीम सुरू केली. फारच कमी वेळ दिला म्हणून काहींनी आयोजकांशी वादही घातला. राष्ट्रीय पक्षसुद्धा यापेक्षा जास्त वेळ मुलाखतीला देतात असा त्यांचा युक्तिवाद होता. यावर आयोजकांनी 'पाटलांचा आदेश शिरसावंद्य' असे नेहमीचे उत्तर दिले. यापेक्षा देवदर्शनालासुद्धा अधिक वेळ मिळतो अशी कुजबुज काहींनी केली पण उघडपणे बोलण्याचे धाडस कुणी दाखवले नाही. ठरल्याप्रमाणे मुलाखतींना सुरुवात झाली. पहिला इच्छुक आत गेला व अर्ध्याच मिनिटात बाहेर आला तसे सारे त्याच्याभोवती गोळा झाले. त्यावर तो म्हणाला 'उमेदवारी मिळाली तर मी सहज निवडून येतो एवढेच बोललो तर त्यांनी मला बाहेर जायला सांगितले.

## प्रासंगिक »

### थाली बचाव..!


***हे वास्तव झाकून ठेवण्याच्या राजकारण्यांच्या प्रयत्नांत-त्यातही अधिक सत्ताधाऱ्यांस-येत असलेले यश हा अत्यंत कळीचा आणि तितकाच वेदनादायी मुद्दा आहे.***

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास म्हणतात की चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीच्या अखेरीस चलनवाढीचा वेग मंदावेल. छान. ही तिसरी तिमाही म्हणजे ऑक्टोबर ते डिसेंबर. म्हणजे सर्व सण-वार संपल्यावर महागाई कमी होईल. ज्या वेळी फारशी काही खरेदी करावयाची नसते त्या वेळी दर कमी होतील. हा युक्तिवाद त्यांनी व्याजदर कपातीच्या संदर्भात केला. चलनवाढीवर एक उतारा हा व्याजदर वाढीचा असतो. व्याजदर वाढले की पैशाचा पुरवठा कमी होतो आणि चलनवाढ टळते. करण्याविरोधात बहुमताने निर्णय घेतला गेला. त्याआधी काही आठवड्यांपूर्वी विद्यमान सरकारातील काही विद्वानांनी महत्त्वाचे खाद्यपदार्थ घटक चलनवाढ निर्देशांक मापनातून वगळण्याची सूचना केली होती. या घटकांमुळे महागाई झाल्याचे दिसून येते.

शिवप्रेरणा उपक्रमांतर्गत महाराष्ट्रात सजग रहो अभियान सुरू झाले आहे. विवेकाचे जागरण करून जाती, भाषा भेदांच्या पलीकडचा बंधुभावयुक्त महाराष्ट्राच्या पुनर्निर्माणाचा संकल्प 'सजग रहो!' अभियानातून केला जाणार आहे. याची राज्यस्तरीय बैठक नुकतीच पुणे येथे झाली.

# प्रक्रिया राज्याची घडी बसवण्याची...

यात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी महाराष्ट्राचे देशातील वैशिष्ट्यपूर्ण स्थान अधोरेखित केले. अशा प्रकारचा होणारा जागर महाराष्ट्रासाठी उपयुक्त आणि आवश्यक आहे यावर एकमत झाले आहे.महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका जाहीर झालेल्या आहेत. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी राजकीय लढत होत आहे. प्रचाराचा कल्लोळ सुरू झालेला आहे. रणधुमाळीला वेग येत आहे. पुढचे काही दिवस राजकीय आवाज महाराष्ट्राला व्यापून टाकणार आहे. महासंग्रामाच्या कल्लोळात सर्वसामान्यांचा आवाज ऐकण्यासाठी, त्यांच्याशी संवाद करण्यासाठी 'सजग रहो!' अभियान कार्यरत झालेले आहे. निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव आहे. मतदारांशी थेट संवाद साधण्याचे खुले व्यासपीठ आहे. निवडणूक काळात मतदार व्यक्त होत असतात. राजकीय घडामोडींवर आपले मत मांडत असतात. प्रचाराच्या बातम्या जाणून घेत असतात. आपल्या राजकीय, वैचारिक भूमिकेनुसार प्रतिसाद देत



असतात. निवडणुकीनिमित्त एक मोठी घुसळण होत असते. अशा घुसळणीला सकारात्मक वळण देण्याचा प्रयत्न 'सजग रहो!' करणार आहे.छत्रपती शिवाजी महाराज, संतवृंद, स्वातंत्र्य योद्धे यांनी त्या वेळी समाजाला सावध करून परिस्थितीची जाणीव करून दिली होती. व्यापक जागृतीतून छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्य उभारले होते. ती जागरणाची परंपरा अनेक मान्यवरांनी पुढे नेली आहे. त्या परंपरेचे वहन म्हणजे 'सजग रहो!' अभियान आहे. राज्यात एक संभ्रमाचे वातावरण असल्याची चर्चा आहे. सर्वसामान्य नागरिकांची जबाबदारी वाढली आहे. मतदारांना विवेकबुद्धीने सक्रिय व्हावे लागणार आहे. यासाठी राज्यातील महाराष्ट्र हितैषी व्यक्ती, सामाजिक संघटना, मित्र मंडळ, व्याख्यानमाला आयोजक, विचारवंत, साहित्यिक, कलाकार असे सगळे सजग एकत्र येऊन शिवप्रेरणा उपक्रमांतर्गत 'सजग रहो!' अभियान करत आहेत. व्याख्यानं, परिसंवाद, चर्चा यातून महाराष्ट्र धर्माचे जागरण केले जाईल.

राज्यावर घोंघावणारे विकास विरोधाचे, जातीय आकसाचे, भाषिक संकुचिततेचे मळभ दूर करून प्रगतिशील महाराष्ट्राचा मार्ग विस्तारला जाईल. महाराष्ट्र प्रथम अशी भावना असणारे यात सहभागी होत आहेत. १०० टक्के तसेच सकारात्मक मतदान, भेदापलीकडचे विकासासाठी मतदान या भूमिकेतून ही चळवळ सुरू आहे. पक्षीय राजकारणापासून दूर तरी महाराष्ट्रीय राजकारणाचा वेध घेणाऱ्या या उपक्रमाचे नेतृत्व साहित्य, कला, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील व्यक्तींकडे आहे. निवडणूक लढवणे हे प्रामुख्याने राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते यांचे काम असे स्वरूप होते

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मविआचा जागा वाटपाचा तिढा कायम!

## काँग्रेसचे 102, शिवसेनचे 96 तर राष्ट्रवादीचे 87 जागांवर उमेदवार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा फॉर्म्युला समोर आला आहे. मात्र, शेवटच्या क्षणापर्यंत महाविकास आघाडीतील जागा वाटपाचा तिढा सुटलेला नाही. कारण महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी 5 ठिकाणी दोन उमेदवार दिले आहेत. शिवसेना ठाकरे गटाकडून 96 उमेदवारांनी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले.**



आहेत. शिवसेना ठाकरे गटाकडून एकूण 96 एबी फॉर्म वाटप करण्यात आले आहेत. त्यानुसार उमेदवारी अर्ज आज शेवटच्या दिवसापर्यंत दाखल करण्यात आले आहेत. शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी या तीन पक्षांच्या मिळून 285 जागा होतात. यात 5 ठिकाणी दोन पक्षांनी एकमेकांविरोधात उमेदवार दिले, म्हणजे 280 जागांवर हे तीन पक्ष एकत्रितपणे लढणार आहेत. ऊर्वरीत 8 या जागा मित्र पक्षांसाठी सोडल्याचे दिसतं. सोलापूर दक्षिणच्या जागेवर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने अमर पाटील यांना उमेदवारी दिली होती. त्याच जागेवर काँग्रेस नेते आणि माजी आमदार दिलीप माने इच्छुक होते. काँग्रेसच्या उमेदवार यादीत दिलीप माने यांचे नाव देखील आले होते. मात्र, दिलीप माने यांना काँग्रेसने एबी फॉर्म दिला नाही. दिलीप माने यांना काँग्रेसने एबी फॉर्म न दिल्याने माने समर्थकांचा मोठा संताप व्यक्त केला आहे. प्रणिती शिंदे आणि काँग्रेसने मोठा दगफटका केल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला आहे. अनेक कार्यकर्त्यांचा डोळ्यात अश्रू, दिलीप माने याने अपक्ष फॉर्म मागे घेऊ नये. काँग्रेसला याचे परिणाम भोगावे लागतील, अशा संतप्त भावना दिलीप माने यांच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत. उमेदवारी अर्जाच्या शेवटच्या दिवसापर्यंत जागावाटपावरून महाराष्ट्रात महाविकास आघाडीमध्ये चुरस होती. दावे-प्रतिदावे यामुळे युतीत फूट पडली आणि आज अखेर ही युती तुटली. त्यानंतर काँग्रेस नेते राजेंद्र मुळक यांनी उद्धव ठाकरेंच्या उमेदवाराविरोधात अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. जिथे मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुळक यांना ग्रामीण काँग्रेसचा पूर्ण पाठिंबा आहे. उमेदवारी अर्जाच्या शेवटच्या दिवसापर्यंत जागावाटपावरून महाराष्ट्रात महाविकास आघाडीमध्ये चुरस होती. दावे-प्रतिदावे यामुळे युतीत फूट पडली आणि आज अखेर ही युती तुटली. त्यानंतर काँग्रेस नेते राजेंद्र मुळक यांनी उद्धव ठाकरेंच्या उमेदवाराविरोधात अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. जिथे मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुळक यांना ग्रामीण काँग्रेसचा पूर्ण पाठिंबा आहे.विधानसभा निवडणुकीत महायुतीत कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार याची उत्सुकता होती. भारतीय जनता पक्ष सर्वाधिक जागा जिंकणार हे स्पष्ट होतं. पण लोकसभेतील त्यांची कामगिरी पाहता मित्रपक्षांना किती जागा सुटणार याबद्दल उत्कंठा होती. भाजप १५० ते १६० जागा लढवेल, अशी शक्यता वर्तवली जात होती. पण भाजपनं प्रत्यक्षात १४८ जागांवर उमेदवार दिले आहेत. मात्र भाजपनं मित्रपक्षांमध्ये आपले नेते आयात करत वेगळाच डाव टाकला आहे. शिंदेसेनेने लोकसभा निवडणुकीनंतर आक्रमक भूमिका घेत ९० ते १०० जागा मागितल्या. तर राष्ट्रवादी काँग्रेस ६० ते ७० जागांसाठी आग्रही होती. दोन्ही पक्षांनी जाहीर केलेल्या उमेदवार याद्यांवर नजर टाकल्यास शिंदेसेनेला ७९, तर अजित पवार गटाला ५१ जागा सुटल्या आहेत. दोन्ही पक्षांना मिळून १३० जागा आहेत. महिन्याकाठी बँकेत जमा होणारा पगार यात जसा फरक असतो, तशीच गत जागावाटपात शिंदेसेना आणि अजित पवार गटाची झाली आहे. शिंदेसेनेनं दिलेल्या ७९ उमेदवारांपैकी तब्बल ११ उमेदवार हे भाजपचे आहेत.

### यांचा समावेश आहे

त्यात शायना एनसी (मुंबादेवी), निलेश राणे (कुडाळ), मुरजी पटेल (अंधेरी पूर्व), अमोल खताळ (संगमनेर), अजित पिंगळे (धाराशिव), दिग्विजय बागल (करमाळा), विठ्ठल लंघे (नेवासा), बळीराम शिरसकर (बाळापूर), विलास तरे (बोईसर), संतोष शेट्टी (भिवंडी पूर्व), राजेंद्र गावित (पालघर) यांचा समावेश आहे. भाजपनं काही नेत्यांना अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पाठवून त्यांनाही उमेदवार केलं आहे. लोकसभेला नांदेडमध्ये पराभूत झालेल्या माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी हातात घड्याळ बांधून घेत लोहा मतदारसंघाची उमेदवारी पदरात पाडून घेतली आहे

---

# बाकीच्यांना पदे दिली ; सुप्रियाला पद दिले नाही

## शरद पवार यांनी अजित दादांना टोला लगावला

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मी राज्यात अनेकांना मंत्री केले, उपमुख्यमंत्री केले. बाकीच्यांना पदे दिली, एकदाही सुप्रियाला पद दिले नाही, असे सांगत शरद पवारांनी अजित दादांना टोला लगावला आहे.**



विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस होता. त्याच बरोबर राज्यात विविध ठिकाणी प्रचार सभांना देखील सुरुवात झाली आहे. लोकसभे प्रमाणे यावेली देखील संपूर्ण राज्याचे तसेच देशाची नजर बारामतीच्या लढतीकडे लागली आहे. येथे उपमुख्यमंत्री अजित पवार विरुद्ध त्यांचे पुतणे युगेंद्र पवार अशी लढत होणार आहे. काल सोमवारी अजित पवारांनी अर्ज दाखल केल्यानंतर झालेल्या भाषणात भावनिक आवाहन केले होते.

यावर आज राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या प्रचारार्थ कन्हेरी येथे आयोजित सभेत शरद पवार यांनी अजित पवार यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. शरद पवारांनी त्यांच्या भाषणात अजित पवारांवर जोरदार टीका केली. बारामतीत मी शेती, दूधाच्या संबंधी कारखाने, कंपन्या आणल्या. मी दारुचा कारखाना आणला नाही, या शब्दात अजित पवार यांच्यावर घणाघात करत शरद पवार म्हणाले, पक्ष मी काढला, चिन्ह माझे होते. काही लोकांनी वेगळा विचार केला. माझ्या आयुष्यात मी कधी कोर्टात उभा राहिलो नव्हतो. ती वेळ त्यांनी आणली.

### नव्या पिढीकडे सगळे अधिकार दिले

शरद गोविंदराव पवार या नावाने मला पहिल्यांदा समन्स आले. केंद्र त्यांच्या हातात होते. कोर्टानेही पक्ष व चिन्ह त्या मंडळींची असल्याचे सांगितले. ही मोठी गंमतीची गोष्ट घडली. माझा पक्ष पळवला, चिन्ह पळवले पण जनतेच्या आग्रहाखातर मी पुन्हा जोर बांधला. पुढे बोलताना पवार म्हणाले, मी राज्यात अनेकांना मंत्री केले, उपमुख्यमंत्री केले. एकदाही सुप्रियाला पद दिले नाही. बाकीच्यांना पदे दिली, असे सांगत पवारांनी अजित दादांना टोला लगावला. मी राज्य चालवायची जबाबदारी सोडत सगळा कारभार त्यांच्या हाती दिला. मी पक्षाचा अध्यक्ष होतो, पण नव्या पिढीकडे सगळे अधिकार दिले.

# कुलिंग कालावधीची अट ठेवू नका

## उच्च न्यायालयाने कौटुंबिक न्यायालयांना केली सूचना

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**परस्पर संमतीने विभक्त होऊ पाहाणाऱ्या जोडप्यांना घटस्फोट मंजूर करण्यापूर्वी सहा महिने वाट पाहायला लावू नका किंवा कुलिंग कालावधीची अट घालू नका, अशी सूचना उच्च न्यायालयाने कौटुंबिक न्यायालयांना केली आहे. अशा प्रकरणांत हा कालावधी वगळला गेल्यास घटस्फोटाच्या प्रक्रियेस गती मिळेल आणि जोडप्यांची मानसिक त्रासातून सुटका होण्यास मदत होईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.**



घटस्फोटाच्या प्रकरणांत कौटुंबिक न्यायालयाची महत्त्वाची भूमिका असते. हिंदू विवाह कायद्याने घटस्फोट मंजूर करण्यापूर्वी सहा महिन्यांचा कुलिंग कालावधीची अट अनिवार्य केलेली नाही. तर आवश्यक वाटल्यास या अटीचा वापर करण्याचे म्हटले आहे. कुलिंग कालावधीची अट सहमतीने घटस्फोट घेऊ इच्छिणाऱ्या जोडप्याची मानसिक वेदना वाढवण्याचे काम करते, त्यामुळे, अशा प्रकरणांत कौटुंबिक न्यायालयाने कुलिंग कालावधी माफ केला जावा किंवा त्याची अट घातली जाऊ नये, असे न्यायामूर्ती गौरी गोडसे यांच्या एकलपीठाने स्पष्ट केले. कुलिंग कालावधी माफीसाठी जोडप्यांकडून अर्ज केले जातात, त्यावेळी घटस्फोटासाठी आवश्यक असलेल्या अटींची दोन्ही पक्षकारांनी पूर्तता केली आहे का ? हे कौटुंबिक न्यायालयाने पाहणे आवश्यक आहे. त्यात, किमान एक वर्षापासून पक्षकार वेगळे राहतात का ? दोन्ही पक्षकारांमध्ये सामंजस्याने वाद मिटवणे शक्य आहे का ? पोटगी आणि मुलांचा ताबा यांसारख्या प्रमुख, परंतु वादाच्या मुद्यांवर परस्पर सहमतीने तोडगा काढण्यात आला आहे क? यांचा समावेश आहे. त्याबाबत, समाधान झाल्यानंतर कौटुंबित न्यायालयाने कुलिंग कालावधी माफ करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्याचे न्यायमूर्ती गोडसे यांच्या एकलपीठाने आदेशात म्हटले आहे. याशिवाय, जोडप्याशी संवाद साधल्यानंतर ते त्यांच्या स्वतंत्र व्यवसायात स्थिरस्थावर असल्याचे आणि त्यांची आर्थिक स्थितीही चांगली असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. तसेच, जोडप्यामधील वाद मिटण्याची कोणतीही शक्यता नसल्याची खात्री पटल्यानंतर घटस्फोटाचा अर्ज प्रलंबित ठेवण्यात काही अर्थ नाही, असेही न्यायमूर्ती गोडसे यांच्या एकलपीठाने स्पष्ट केले. अंधेरीस्थित ३१ वर्षांच्या महिलेने दुबईस्थित पतीसह परस्पर सहमतीने घटस्फोटासाठी कौटुंबिक न्यायालयात अर्ज केला होता.

या जोडप्याचा जून २०२१ मध्ये विवाह झाला. परंतु, काही कालावधीतच नात्यात दुरावा निर्माण झाल्यामुळे ५ मे २०२३ पासून हे जोडपे विभक्त राहू लागले. एक वर्षाहून अधिक काळ वेगळे राहिल्यानंतर त्यांनी परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज केला. जोडप्याने हिंदू विवाह कायद्याच्या कलम १३बी नुसार सहा महिन्यांचा कुलिंग कालावधी माफ करण्याची विनंती कौटुंबिक न्यायालयाकडे केली होती. हे कलम कौटुंबिक न्यायालये आणि जिल्हा न्यायालयांना संयुक्त अर्ज दाखल केल्यानंतर सहा महिन्यांची मुदत संपण्यापूर्वी परस्पर संमतीने घटस्फोटाचे आदेश देण्यास प्रतिबंधित करते. जोडप्याची मागणी वांद्रे कौटुंबिक न्यायालयाने फेटाळून लावली आणि त्यांना समुपदेशनासाठी पाठवले. पुढे दोघांनाही परस्पर संमतीने घटस्फोटासाठी संयुक्त अर्ज केला. त्यानंतर, या जोडप्याने उच्च न्यायालयात धाव घेऊन त्यांनी परस्पर संमतीने विभक्त होण्याचा निर्णय घेतल्याचे न्यायालयाला सांगितले.

### सामंजस्याने वाद मिटवणे शक्य

घटस्फोटाच्या प्रकरणांत कौटुंबिक न्यायालयाची महत्त्वाची भूमिका असते. हिंदू विवाह कायद्याने घटस्फोट मंजूर करण्यापूर्वी सहा महिन्यांचा कुलिंग कालावधीची अट अनिवार्य केलेली नाही. तर आवश्यक वाटल्यास या अटीचा वापर करण्याचे म्हटले आहे. कुलिंग कालावधीची अट सहमतीने घटस्फोट घेऊ इच्छिणाऱ्या जोडप्याची मानसिक वेदना वाढवण्याचे काम करते, त्यामुळे, अशा प्रकरणांत कौटुंबिक न्यायालयाने कुलिंग कालावधी माफ केला जावा किंवा त्याची अट घातली जाऊ नये, असे न्यायामूर्ती गौरी गोडसे यांच्या एकलपीठाने स्पष्ट केले. कुलिंग कालावधी माफीसाठी जोडप्यांकडून अर्ज केले जातात, त्यावेळी घटस्फोटासाठी आवश्यक असलेल्या अटींची दोन्ही पक्षकारांनी पूर्तता केली आहे का ? हे कौटुंबिक न्यायालयाने पाहणे आवश्यक आहे. त्यात, किमान एक वर्षापासून पक्षकार वेगळे राहतात का ? दोन्ही पक्षकारांमध्ये सामंजस्याने वाद मिटवणे शक्य आहे का ?


---

# आयुष्मान योजनेचा 6 कोटी वृद्धांना लाभ!

## आयुष्मान योजनेचा आजपासून 5 लाखांचा मोफत इलाज

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी धनत्रयोदशी आणि 9 व्या आयुर्वेददिनी 70 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींसाठी 5 लाख रुपयांच्या मोफत उपचाराची सुविधा सुरू केली. याअंतर्गत देशातील 6 कोटी वृद्धांना लाभ मिळणार आहे.**



वास्तविक, केंद्र सरकारने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचा विस्तार केला आहे आणि त्यात वृद्धांचा समावेश केला आहे. यावेळी मोदींनी दिल्लीतील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद मध्ये ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान वय वंदन कार्ड दिले. पंतप्रधान म्हणाले, मी दिल्ली आणि बंगालमधील 70 वर्षपिक्षा जास्त वयाच्या वृद्धांची माफी मागतो की, मी त्यांची सेवा करू शकणार नाही. तुम्हाला त्रास होईल, पण मी मदत करू शकणार नाही. कारण- दिल्ली आणि बंगाल सरकार या योजनेत सामील होत नाहीयेत. मी देशवासीयांची सेवा करण्यास सक्षम आहे, याबद्दल मी माफी मागतो, परंतु राजकीय स्वार्थ मला दिल्ली-बंगालमध्ये सेवा करू देत नाही. माझ्या हृदयात किती वेदना होत असतील हे मी शब्दात व्यक्त करू शकणार नाही. मोदींनी 29 ऑक्टोबर रोजी 12,850 कोटी रुपयांच्या आरोग्य प्रकल्पांचे उद्घाटन केले. पंतप्रधानांनी मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, बिहारसह 18 राज्यांमध्ये आरोग्य प्रकल्पांचे अक्षरशः शुभारंभ केले. यासोबतच त्यांनी ऋषिकेश एम्समधून देशातील पहिली एअर ॲम्ब्युलन्स संजीवनीही लाँच केली.

### जनआरोग्य योजनेचा विस्तार केला

वास्तविक, केंद्र सरकारने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचा विस्तार केला आहे आणि त्यात वृद्धांचा समावेश केला आहे. यावेळी मोदींनी दिल्लीतील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद मध्ये ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान वय वंदन कार्ड दिले. पंतप्रधान म्हणाले, मी दिल्ली आणि बंगालमधील 70 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या वृद्धांची माफी मागतो की, मी त्यांची सेवा करू शकणार नाही. तुम्हाला त्रास होईल, पण मी मदत करू शकणार नाही. कारण- दिल्ली आणि बंगाल सरकार या योजनेत सामील होत नाहीयेत.

# सुमीत पुसावळेचं कुटुंबीयांसह सेलिब्रेशन

'स्टार प्रवाह' वाहिनीवर लवकरच 'घरोघरी मातीच्या चुली' ही नवी मलिका सुरू होणार आहे. अभिनेत्री रेश्मा शिंदे, सविता प्रभुणे, प्रमोद पवार, उदय नेने, आरोही सांबरे अभिनीत ही मालिका १८ मार्चपासून संध्याकाळी ७.३० वाजता पाहायला मिळणार आहे. या मालिकेत हृषिकेश या प्रमुख भूमिकेसाठी अभिनेता सुमीत पुसावळेची वर्णी लागली आहे. याआधी सुमीत 'बाळूमामाच्या नावानं चांगभलं' या मालिकेत झळकला होता. पण आता मालिकेतून त्याने एक्झिट घेत तो नव्या रुपात भेटीस येणार आहे. अलीकडेच अभिनेता सुमीत पुसावळे 'घरोघरी मातील चुली' या मालिकेत झळकणार असल्याचं जाहीर झालं. तेव्हापासून तो चर्चेत आला आहे. सुमीतने या नव्या प्रवासानिमित्ताने कुटुंबियांबरोबर सेलिब्रेशन केलं. याचा व्हिडीओ अभिनेत्याची बायको मोनिका पुसावळेने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. याशिवाय मोनिकाने सुमीतसाठी इन्स्टाग्राम स्टोरीवरही खास पोस्ट लिहिल्या होत्या.'बाळूमामांच्या नावानं चांगभलं' या मालिकेतील सुमीतचा प्रवास संपल्याच्यानिमित्ताने मोनिकाचे काही फोटो शेअर करत पोस्ट लिहिली. मोनिकाने लिहिलं की, सुमीत तुझ्या कामाबद्दलचं प्रेम, निष्ठा, मामांवरचं प्रेम, विश्वास हे सगळं मी खूप जवळून अनुभवलं आहे. तू मामांचं कार्य घराघरात पोहोचवलं. उन्ह असो, पाऊस असो कधी तू आणि तुझी टीम थांबली नाही. मला आज बायको म्हणून खूप अभिमान वाटतोय. तुला प्रत्येकाने जे प्रेम दिलं आहे ते असंच कायम राहो आणि तुझ्या मनातल्या सर्व इच्छा पूर्ण व्हावी हिच मामांच्या चरणी प्रार्थना.

# 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' पोहोचली ऑस्ट्रेलियात!

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा कार्यक्रम घराघरांत लोकप्रिय आहे. यामधील प्रत्येक विनोदवीर प्रेक्षकांना आपलासा वाटतो. हास्यजत्रेमुळे अनेक नवोदित कलाकारांना एक वेगळी ओळख मिळाली. परदेशातील प्रेक्षकांना सुद्धा या कार्यक्रमाची तुफान क्रेझ आहे. त्यामुळे हास्यजत्रेची टीम अनेकदा परदेश दौऱ्यावर जाऊन तेथील प्रेक्षकांचं मनोरंजन करत असते. गेल्यावर्षी ही संपूर्ण टीम अमेरिका दौऱ्यावर गेली होती. आता यंदाच्या वर्षी महाराष्ट्राला खळखळून हसवणारे हे विनोदवीर ऑस्ट्रेलियात पोहोचले आहेत. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'ची संपूर्ण टीम ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेली असून याठिकाणी सिडनी, मेलबर्न अशा महत्त्वाच्या शहरांमध्ये हे कलाकार लाइव्ह परफॉर्म करणार आहेत. विनोदवीरांसह या कार्यक्रमाची सूत्रसंचालिका अभिनेत्री प्राजक्ता माळी देखील ऑस्ट्रेलियात पोहोचली आहे. याठिकाणी या संपूर्ण टीमने मिळून एका ट्रेंडिंग गाण्यावर जबरदस्त डान्स केला. याचा खास व्हिडीओ प्राजक्ताने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. ऑस्ट्रेलियाच्या समुद्रकिनारी प्राजक्तासह पृथ्वीक प्रताप, सचिन मोटे, समीर चौघुले, नम्रता संभेराव, वनिता खरात, प्रसाद खांडेकर, ओंकार राऊत, चेतना भट या सगळ्या कलाकारांनी मिळून "कुडिये नी..." या लोकप्रिय गाण्यावर डान्स केला."आम्ही ऑस्ट्रेलियात एकत्र अशी मजा करतोय... सचिन मोटे सर सुद्धा सामील झाले, याचा विशेष आनंद!

# साराची सर्वोत्कृष्ट भूमिका?



सारा अली खान नावाच्या अभिनेत्रीची आजवरची सर्वोत्कृष्ट भूमिका म्हणून तिच्या ए वतन मेरे वतन नावाच्या चित्रपटाचे नाव सांगावे लागेल. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया सोशल (AE WATAN MERE WATAN TRAILER NEWS) मीडियावर नेटकऱ्यांकडून येत आहेत. त्याला कारण या चित्रपटाचा व्हायरल झालेला ट्रेलर. बऱ्याच दिवसांपासून या चित्रपटाच्या ट्रेलरची चर्चा रंगली आहे. गेल्या वर्षी सारानं तिच्या चित्रपटांनं नेटकऱ्यांचे, चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. तिचा विकी कौशल सोबत प्रदर्शित झालेला चित्रपटही चर्चेचा (SARA ALI KHAN VIRAL NEWS) विषय होता. या सगळ्यात अॅमेझॉन प्राईमवर प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटातून साराचा एक वेगळाच अंदाज दिसून येतो. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा तो काळ. इंग्रजांची ती जुलमी राजवट मोडून काढण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीनं मोहिमा सुरु होत्या. त्यातील एका मोहिमेचं प्रतिनिधीत्व सारा अली खान करते आहे.मेरे वतन हा अशा एका महिलेची कथा सांगतो जिनं तिच्या धाडसीपणानं देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्वाची भूमिका साकारली आहे. या चित्रपटामध्ये सारानं उषा नावाच्या मुलीची भूमिका वठवली असून त्यात तिचा स्वातंत्र्याप्रतीचा संघर्ष दिसून आला आहे. १९४२ साली भारत छोडो जे आंदोलन छेडले गेले त्यात भूमीगत राहून रेडिओ स्टेशन चालवण्याचे काम उषानं केलं होतं. ते हे या चित्रपटातून दिसून येते. ट्रेलरच्या सुरुवातीला दिसते की, सारा अली खान ही हातात तिरंगा घेतलेली दिसते.

# अरेंज मॅरेजमधून उलगडणार लव्ह स्टोरी

लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वे नेहमीच चर्चेत असते. 'देवयानी' या मालिकेतून शिवानी घराघरांत पोहचली. काही महिन्यांपूर्वीच तिचा झिम्मा २ चित्रपट प्रदर्शित झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला भरभरून प्रतिसादम मिळाला होता. मराठीबरोबर शिवानीने हिंदी मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. आता लवकरच शिवानी 'ऊन सावली' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर भूषण प्रधानची प्रमुख भूमिका आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. 'ऊन सावली' हा चित्रपट प्रणय आणि आन्वीची प्रेमकथा आहे. 'एक अरेन्ज मॅरेज ही अद्भुत लव स्टोरी असू शकते' ह्या वाक्यात 'ऊन सावलीचे' गूढ लपलेले आहे. एकमेकांच्या डोळ्यात डोळे घालून पाहणारे हे सुंदर जोडपं बरच काही सांगू पाहत आहे, बरच काही बोलू इच्छित आहेत. पहिल्या भेटीतच प्रणयला आन्वी आवडते. परंतु आन्वीचा विरोध हा कायम आहे. तिच्या मनात तर वेगळाच गोंधळ चालू आहे. हा चित्रपट लग्न करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला स्वतःशी जोडणारा आहे.तिकीट विंडो पिक्चर्स बॅनरअंतर्गत समीर ए शेखद्वारा या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. सार्थक नकुल यांनी या चित्रपटाला संगीत दिले आहे. या चित्रपटात भूषण व शिवानीबरोबर अजिंक्य ननावरे, राज सरनागत, अंकिता भोईर, विकास हांडे, श्वेता कामत, प्रिया तुळजापूरकर आणि मनाली निकम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या १५ मार्चला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वे नेहमीच चर्चेत असते. 'देवयानी' या मालिकेतून शिवानी घराघरांत पोहचली. काही महिन्यांपूर्वीच तिचा झिम्मा २ चित्रपट प्रदर्शित झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला भरभरून प्रतिसादम मिळाला होता. मराठीबरोबर शिवानीने हिंदी मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. आता लवकरच शिवानी 'ऊन सावली' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर भूषण प्रधानची प्रमुख भूमिका आहे.

# माझ्या सर्व चाहत्यांचे खूप आभार मानते



मनिषा राणी ही आता झलक दिखला जा च्या अकराव्या सीझनची विजेती झाली आहे. त्यानंतर तिची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून तिच्या नावाची जोरदार चर्चा होती. अखेर तिच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. सोशल मीडियावर एक दिवस अगोदरच मनिषाचं नाव विजयी म्हणून समोर आले होते. टीव्ही मनोरंजन क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून सुरु असणाऱ्या रियॅलिटी शो मध्ये झलक दिखला जा चे नाव घेता येईल. या रियॅलिटी शो चा अकरावा सीझन पार पडला असून त्यातील सहभागी स्पर्धकांविषयी चाहत्यांना कमालीची उत्सुकता असल्याचे दिसून आले आहे. अशातच मनिषा राणीनं विजेतेपद मिळवल्यानंतर तिनं दिलेल्या प्रतिक्रियेनं नेटकऱ्यांच्या चर्चेला उधाण आले आहे. सोशल मीडियावर मनिषाच्या नावाची चर्चा आहे. ती विजयी होताच तिच्याव चाहत्यांनी, नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. या सगळ्यात मनिषाची प्रतिक्रिया देखील चर्चेत आली आहे. ती नेमकी काय म्हणाली हेही आपण जाणून घेऊयात. मनिषाला झलक दिखला जा चे विजेतेपद मिळवल्यानंतर तिला ३० लाख रुपयांचे बक्षीस देण्यात आले. त्यानंतर तिनं इंस्टावरुन चाहत्यांचे आभार मानले आहेत. तिनं म्हटलं आहे की, मी माझ्या सर्व चाहत्यांचे खूप आभार मानते. त्यांच्या मुळेच हा प्रवास शक्य झाला. त्यांनी केलेल्या सहकार्याविषयी मी त्यांची आभारी आहे.त्या व्हिडिओच्या शेवटी ती म्हणते की, मी आता जे काही पाहते आहे ते सगळं खरं आहे यावर माझा विश्वासच बसत नाही. माझ्यासाठी एक ते दीड लाख वोटिंग एका दिवसांत आली. मला एवढं प्रेम मिळालं हेच माझ्यासाठी खूप आहे. लोकांनी मला जे खूप सहकार्य केले त्यासाठी त्यांना धन्यवाद. अशा शब्दांत मनीषा राणीनं तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत.टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध रियॅलिटी शो झलक दिखला जा च्या अकराव्या सीझनचा ग्रँड सीझन नुकताच पार पडला.त्याला बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री हुमा कुरेशी हजर होती. यावेळी बिग बॉसच्या १७ व्या सीझनचा विजेता मुनव्वर देखील उपस्थित होता. या सगळ्यात एका व्हिडिओनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. मनीषा राणीनं यंदाच्या झलक दिखजा चे विजेतेपद मिळवून आपल्या नावाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. बऱ्याच दिवसांपासून झलक दिखला जा ची चर्चा होती. अखेर त्याचा यंदाचा सीझन संपला असून त्यानं चाहत्यांचा निरोप घेतला आहे. या सगळ्यात शेवटच्या एपिसोडमध्ये चर्चा रंगली होती ती हुमा कुरेशी आणि मुनव्वर फारुखीची. त्यानं तिची टिंगल केल्याचे दिसून आले आहे.

# कोहलीने मला इन्स्टाग्रामवर ब्लॉक केलं!

## मॅक्सवेलने विराट कोहलीबाबतचा एक मोठा खुलासा केला

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलियाचा उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू ग्लेन मॅक्सवेल गेली अनेक वर्षे विराट कोहलीबरोबर आरसीबी संघाचा भाग आहे. विराट आणि ग्लेन दोघेही खूप घट्ट मित्र आहेत. क्रिकेट मैदानावर आणि मैदानाबाहेरही याचा प्रत्यत आपल्याला आला आहे. मॅक्सवेलला RCB ने आयपीएल २०२१ च्या आधी १४.२५ कोटी रुपयांच्या मोठ्या रकमेत सामील केले होते. या हंगामात, मॅक्सवेलने आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी केली आणि आरसीबीला प्लेऑफमध्ये नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. यापूर्वी मॅक्सवेल पंजाब किंग्स संघाचा भाग होता. पण आता एका पोडकास्टमध्ये बोलताना मॅक्सवेलने कोहलीबाबत एक मोठा खुलासा केला आहे.**




मॅक्सवेलने LISTNR स्पोर्ट्स पॉडकास्टवर बोलताना सांगितलं, "जेव्हा मला कळलं की मी RCB मध्ये जात आहे, तेव्हा विराट हा पहिला होता, ज्याने मला मेसेज करत संघात माझे स्वागत केले. नंतर जेव्हा मी आयपीएलपूर्वीच्या प्रशिक्षण शिबिरासाठी गेलो होतो, तेव्हा आम्ही गप्पा मारल्या आणि प्रशिक्षणादरम्यान बराच वेळ घालवला. त्यामुळे त्यानंतर मी सोशल मीडियावर त्याला फॉलो करण्यासाठी गेलो. यापूर्वी मी कधी विचार केला नव्हता की त्याला फॉलो करू. माझ्या डोक्यातही तसं कधी आलं नव्हतं. पुढे सांगताना मॅक्सवेल म्हणाला, मला हे माहिती होतं की तो सोशल मीडियावर तो असणारच. त्यामुळे मी आधी फार काही विचार केला नव्हता. पण जेव्हा मी सोशल मीडियावर सर्च करत होतो त्याला पण त्याचं अकाऊंट कुठेच दिसेना. त्यानंतर मला कोणीतरी सांगितलं की त्याने कदाचित तुला इन्स्टाग्रावर ब्लॉक केलं असावं आणि म्हणूनच तू सर्च करूनही तुला तो दिसत नसेल. मला वाटलं असं काही नसेल.पुढे मॅक्सवेल कोहलीबरोबर याबाबत बोलला आणि त्याने कोहलीला विचारलं, तेव्हा दोघांमधील बोलणं सांगताना मॅक्सवेल म्हणाला, त्यानंतर मी गेलो आणि कोहलीला विचारलं, तू मला इन्स्टाग्रामवर ब्लॉक केलं आहेस का आणि तो म्हणाला, हो, मी तेव्हा ब्लॉक केलं होतं, जेव्हा तू कसोटी सामन्यात मला चिडवलं होतस, मी तेव्हा वैतागलो होतो आणि मग तुला सोशल मीडियावर ब्लॉक करायचं ठरवलं. त्यानंतर मी म्हटलं ठीके आणि मग त्याने मला अनब्लॉक केलं, त्यानंतर आम्ही चांगले मित्र झालो.२०१७ मध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळल्या गेलेल्या बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये दोन्ही संघांकडून बरीच आक्रमकता पाहायला मिळाली. या मालिकेतील तिसऱ्या सामन्यादरम्यान कोहलीच्या खांद्याला दुखापत झाली होती. यावेळी क्षेत्ररक्षण करताना ग्लेन मॅक्सवेलने खांदा धरून कोहलीची त्याची खिल्ली उडवली. त्यामुळे कोहली संतापला होता. तेव्हा कोहलीने त्याला ब्लॉक केले होते. पण मॅक्सवेलबरोबर बोलल्यानंतर कोहलीने त्याला अनब्लॉक केलं. मॅक्सवेलने LISTNR स्पोर्ट्स पॉडकास्टवर बोलताना सांगितलं, "जेव्हा मला कळलं की मी RCB

### आम्ही चांगले मित्र झालो

आम्ही चांगले मित्र झालो २०१७ मध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळल्या गेलेल्या बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये दोन्ही संघांकडून बरीच आक्रमकता पाहायला मिळाली. या मालिकेतील तिसऱ्या सामन्यादरम्यान कोहलीच्या खांद्याला दुखापत झाली होती. यावेळी क्षेत्ररक्षण करताना ग्लेन मॅक्सवेलने खांदा धरून कोहलीची त्याची खिल्ली उडवली. त्यामुळे कोहली संतापला होता. तेव्हा कोहलीने त्याला ब्लॉक केले होते.ऑस्ट्रेलियाचा उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू ग्लेन मॅक्सवेल गेली अनेक वर्षे विराट कोहलीबरोबर आरसीबी संघाचा भाग आहे.

मध्ये जात आहे, तेव्हा विराट हा पहिला होता, ज्याने मला मेसेज करत संघात माझे स्वागत केले. नंतर जेव्हा मी आयपीएलपूर्वीच्या प्रशिक्षण शिबिरासाठी गेलो होतो, तेव्हा आम्ही गप्पा मारल्या आणि प्रशिक्षणादरम्यान बराच वेळ घालवला. त्यामुळे त्यानंतर मी सोशल मीडियावर त्याला फॉलो करण्यासाठी गेलो. यापूर्वी मी कधी विचार केला नव्हता की त्याला फॉलो करू. माझ्या डोक्यातही तसं कधी आलं नव्हतं. पुढे सांगताना मॅक्सवेल म्हणाला, मला हे माहिती होतं की तो सोशल मीडियावर तो असणारच. त्यामुळे मी आधी फार काही विचार केला नव्हता. पण जेव्हा मी सोशल मीडियावर सर्च करत होतो त्याला पण त्याचं अकाऊंट कुठेच दिसेना. त्यानंतर मला कोणीतरी सांगितलं की त्याने कदाचित तुला इन्स्टाग्रावर ब्लॉक केलं असावं आणि म्हणूनच तू सर्च करूनही तुला तो दिसत नसेल. मला वाटलं असं काही नसेल.पुढे मॅक्सवेल कोहलीबरोबर याबाबत बोलला आणि त्याने कोहलीला विचारलं, तेव्हा दोघांमधील बोलणं सांगताना मॅक्सवेल म्हणाला, त्यानंतर मी गेलो आणि कोहलीला विचारलं, तू मला इन्स्टाग्रामवर ब्लॉक केलं आहेस का आणि तो म्हणाला, हो, मी तेव्हा ब्लॉक केलं होतं, जेव्हा तू कसोटी सामन्यात मला चिडवलं होतस, मी तेव्हा वैतागलो होतो आणि मग तुला सोशल मीडियावर ब्लॉक करायचं ठरवलं. त्यानंतर मी म्हटलं ठीके आणि मग त्याने मला अनब्लॉक केलं.

# मालिका विजयानंतर न्यूझीलंड संघाला बसला धक्का

## केन विल्यमसनला तिसरी कसोटीही खेळता येणार नाही

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या मालिकेतील शेवटची कसोटी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवली जाणार आहे. या सामन्यापूर्वी किवी संघाला धक्का बसला असून, तिसऱ्या कसोटीतून हा अनुभवी फलंदाज बाहेर पडला आहे. मालिकेतील शेवटच्या कसोटीपूर्वी किवी संघाला हा धक्का बसला असून, अनुभवी फलंदाज केन विल्यमसनला तिसरी कसोटीही खेळता येणार नाही.**



विल्यमसन दुखापतीमुळे बेंगळुरू आणि पुण्यातील कसोटीत खेळू शकला नाही. विल्यमसन बेंगळुरू आणि पुण्यातील पहिल्या दोन कसोटीतही खेळू शकला नाही. श्रीलंका दौऱ्यात त्याच्या मांडीला दुखापत झाली होती. हेगले ओव्हल येथे २८ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मायदेशातील कसोटी मालिकेदरम्यान केन पुनरागमन करण्याची शक्यता आहे. या सिनियर फलंदाजाच्या अनुपस्थितीत, टॉम लॅथमच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंडने भारतात पहिली कसोटी मालिका जिंकून इतिहास घडवला. न्यूझीलंड क्रिकेटने सांगितले की, "विलियमसनने चांगली प्रगती केली आहे, परंतु सावधगिरी बाळगल्याने तो इंग्लंडविरुद्धच्या मालिकेपूर्वी पूर्णपणे तंदुरुस्त होईल." केन त्याच्या दुखापतीतून सावरत आहे, पण पूर्णपणे संघात खेळण्यासाठी तो तयार नाही," असे प्रशिक्षक गॅरी स्टेड म्हणाले. तो दुखापतीतून लवकर सावरेल असे चिन्ह असताना आम्हाला वाटते की तो न्यूझीलंडमध्ये राहणं आणि त्याच्या पुनर्वसनाच्या अंतिम टप्प्यावर लक्ष केंद्रित करणं त्याच्यासाठी चांगले आहे.

### इंग्लंडविरुद्ध मालिकेसाठी तयार

जेणेकरून तो इंग्लंडविरुद्ध मालिकेसाठी तयार होऊ शकेल. इंग्लंड मालिकेला अजून एक महिना बाकी आहे. म्हणून आता सावध दृष्टिकोन स्वीकारल्यास तो क्राइस्टचर्चमधील पहिल्या कसोटीसाठी तो मैदानात उतरेल.न्यूझीलंडने बेंगळुरू आणि पुणे कसोटी जिंकून प्रथमच भारतात कसोटी मालिका जिंकली आहे. टीम साऊदीने अलीकडेच कर्णधारपदावरून पायउतार झाल्यानंतर टॉम लॅथम पहिल्यांदाच कायमस्वरूपी कर्णधारपदाची सूत्रे हाती घेत आहे.